महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्रमांक- युएनआय/परि/पावसाळी अधिवेशन/अधि.३/विशि-१ /7172 दिनांक- 22 JUN 2018

प्रति,

१.कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

२.सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषय-विधानमंडळ अधिवेशन (पावसाळी) अनुषंगाने करावयाची कार्यवाही**

दिनांक ४ जुलै, २०१८ पासून विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन नागपूर येथे सुरु होत आहे. राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संबंधित प्रकरणांवर मोठया प्रमाणात तारांकित /अतारांकित प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व विद्यापीठांना देण्यात येत आहे.

१. सर्व विद्यापीठांनी तारांकित/अतारांकित प्रश्न, स्थगन प्रस्ताव, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, अर्धातास चर्चा इत्यादी व्दारे उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांसदर्भात परिपुर्ण माहिती शासन/संचालनालयास मुदतीत सादर करणेसाठी किमान उपकुलसचिव दर्जाच्या अधिका-याची समन्वयक म्हणून नियुक्ती करावी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक , भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल सह या संचालनालयास तात्काळ अवगत करावा.

२. संपुर्ण अधिवेशन काळात संबंधित समन्वयक पुर्णवेळ कार्यालयात उपस्थित राहून संचालनालयाच्या संपर्कात राहतील याबाबत त्यांना अवगत करावे. तसेच संपुर्ण अधिवेशन कालावधीत त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक सुरु राहील याबाबत दक्षता घेण्याबाबत सूचित करावे.

३. विद्यापीठांतर्गत विविध विभागाकडून प्रश्नांची उत्तरे, पूरक टिपणी संकलित करण्याची जबाबदारी समन्वयकाची राहील.

४. तारांकित/अतारांकित प्रश्नांच्या उत्तरासोबत पाठविण्यात येणारी पूरक टिपणी परिपुर्ण व स्वयंस्पष्ट असावी. उपस्थित करण्यात आलेल्या प्रकरणाची पुर्वपिठीका, सद्यस्थिती तसेच विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने उपस्थित होऊ शकणारे उपप्रश्न, उपलब्ध आकडेवारी, सहपत्रे इबाबत .स्पष्ट अभिप्राय पूरक टिपणीत असणे आवश्यक आहे.

५. सर्व कुलसचिवांनी प्रश्नांची उत्तरे व पूरक टिपणी समर्पक व परिपुर्ण असलेबाबत खात्री करुनच स्वाक्षरी करावी.

६. अधिवेशनासाठी उपस्थित करण्यात आलेल्या तसेच होऊ शकणा-या प्रकरणनिहाय सविस्तर टिपणी दिनांक २७.०६.२०१८ पुर्वी संचालनालयास सादर करणेत यावी.

७. अधिवेशनात चर्चेसाठी स्वीकृत करण्यात आलेल्या प्रकरण/प्रश्नासंदर्भात मा.मंत्री महोदय/मा.सचिव यांना ब्रिफिंग करणेसाठी स्वत: कुलसचिव अथवा माहितगार उपकुलसचिव यांनीच उपस्थित राहणे आवश्यक आहे. उच्च शिक्षणासंदर्भात प्रश्न दर सोमवारी व गुरुवारी चर्चेसाठी घेतले जातात.

८. संचालनालयास/शासन यांचेमार्फत प्राप्त तारांकित /अतारांकित प्रश्नांची उत्तरे/पूरक टिपणी शक्यतो त्याच दिवशी सादर करण्यात यावी. विधानमंडळ कामकाजाचे गांभीर्य पाहता विलंब टाळण्यात यावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- माहितीस्तव सादर-

१. खाजगी सचिव, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
२. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ३२

Estd. 1962
NAAC "A" Grade

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### परिपत्रक

वरील प्रमाणे मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. २२/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र विधान मंडळाचे (पावसाळी) अधिवेशन नागपूर येथे दि.०४/०७/२०१८ पासून सरू होत आहे. यास्तव अधिवेशनाच्या कामकाजाच्या अनुषंगाने विद्यापीठाशी संबंधित माहिती शासनास तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी **समन्वयक अधिकारी म्हणून श्री.व्ही.एस.सोवम, उपकुलसचिव आस्थापना विभाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

तरी संचालनालयाने कळविल्यानुसार विद्यापीठातील तारांकित / अतारांकित प्रश्नांची उत्तरे / पूरक टिपणी त्याच दिवशी सादर करण्यात यावेत. विधानमंडळ कामकाजाचे गांभीर्य पाहता कार्यालय सोडण्यापूर्वी संचालनालयाकडे / विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे काही तातडीची माहिती आवश्यक आहे किंवा कसे याची खात्री करूनच सहायक कुलसचिव व अधीक्षक यांनी समन्वयक अधिकाऱ्यांची परवानगी घेवूनच कार्यालय सोडावे. संचालनालय / विभागीय सहसंचालक यांना देण्यात येणाऱ्या तारांकित / अतारांकित प्रश्नांच्या उत्तरांची छायांकित प्रत इकडील विभागास पाठविण्यात याव्यात. सदरचे परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी / सेवकांच्या निदर्शनास आणावे.

कुलसचिव

जा.क्र. एसयुके/आस्थापना-२ / 1886 दिनांक :- 28 JUN 2018

प्रति,

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र ४. संचालक, विद्यार्थी कल्याण ५. सर्व रेक्टर्स

प्रत :- मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.